"प्रलये तन्निवृत्तो" येथें **अभ्यास** झालेला आहे. "मैवं मांसमयी काचित्" ह्या ठिकाणीं अपूर्वता "भाष्यवार्तिक-काराभ्याम्०" ह्या ठिकाणीं फल. "एतत्पदं वसिष्ठेन०" ह्या वरून **अर्थवाद** हें **लिंग स्पष्ट** होतें. "प्रलये तन्निवृत्तौ" येथें उपपत्तिहि सांगण्यांत आली आहे. ।।६९।।

।। श्री: ।।

५ महावाक्यविवेक:

-ब्रह्मात्मैक्यज्ञान हेंच एक मुमुक्षूला मुक्ति मिळण्याचें साधन आहे. म्हणून तें सिद्ध होण्याकरितां ऋग्वेदादि चारी वेदांतील चार महावाक्यांचा अर्थ क्रमानें सांगण्याच्या इच्छेनें परम कृपाळु श्रीविद्यारण्यस्वामी प्रथम ऐतरेय आरण्यकस्थ 'प्रज्ञानं ब्रह्म' (ऐत ५-३) या महावाक्यांतील 'प्रज्ञान-' शब्दाचा अर्थ सांगतात-

येनेक्षते शृणोतीदं जिघ्रति व्याकरोति च ।
स्वाद्वस्वादू विजानाति तत्प्रज्ञानमुदीरितम् ।।१

अन्वयार्थ- [येन ईक्षते-] प्राणी ज्याच्या योगानें पाहतो; [येन श्रुणोति-] ज्याच्या योगानें ऐकतो, [येन जिघ्रति-] ज्याच्या योगानें वास घेतो येन व्याकरोति- ज्याच्या योगानें बोलतो [च येन स्वाद्वस्वादू विजानाति-] आणि ज्याच्या योगानें स्वादु व अस्वादु जाणतो [तत् प्रज्ञानं उदीरितम्-] तें प्रज्ञान असें सांगितलें आहे.

प्रकाश:- नेत्रद्वारा बाहेर जाणाऱ्या अंत:करणवृत्तींमध्यें प्रतिबिंबित झालेल्या चैतन्यानें प्राणी या सृष्टींतील सर्व रूपवान् पदार्थ पाहतो. तसेच श्रोत्रद्वारा बाहेर पडणाऱ्या अंत:करणवृत्तींतील चैतन्याभासानें सर्व शब्द ऐकतो, त्याचप्रमाणें घ्राणेंद्रियद्वारा सर्व गंधांचा वास घेतो. इत्यादिक वाक्यांची योजना करावी. तात्पर्य चक्षुरादिक इंद्रियें व अंत:करण यांच्या त्या त्या शक्तीवरून ज्ञान होणारें जें साक्षिचैतन्य तेंच प्रज्ञान होय. कारण पूर्वोक्त इंद्रियें व अंत:करण सुद्धां जड असल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं कांहीं काल (केवळ स्वप्न व जाग्रदवस्थेंत) भासणारें चैतन्य मुख्य नव्हे; ही गोष्ट सिद्ध आहे. सूर्य जसा उदकांत प्रतिबिंबित होतो किंवा मुख आरशांत प्रतिबिंबित होतें, तसेंच हें चैतन्य प्रतिबिंबित होत असेल असें येथें समजूं नये. कारण सूर्यादि बिंबें व उदकादि उपाधि हीं जशीं मूर्त (साकार) व मर्यादित आहेत, त्याप्रमाणें हें चैतन्य मूर्त किंवा मर्यादित नाहीं. यास्तव 'अंत:करणरूप अति स्वच्छ व योग्य स्थळीं चैतन्याचा भास होतो' असा याचा अर्थ समजावा. प्रतिबिंब उपाधि असेपर्यंत असतें, तें बिंबाच्यासत्तेनेंच सत्तावान् होतें आणि तें व उपाधि यांचा जरी नाश झाला तरी बिंबाचा नाश होत नाहीं. ह्या तीन गोष्टी सुचविण्याकरितां प्रस्तुत शब्दाचा येथें उपयोग केलेला आहे. ।।१।।

-याप्रमाणें 'प्रज्ञान-' शब्दाचा अर्थ सांगून आता 'ब्रह्म-' शब्दाचा अर्थ सांगतात-

चतुर्मुखेन्द्रदेवेषु मनुष्याश्वगवादिषु ।
चैतन्यमेकं ब्रह्मात: प्रज्ञानं ब्रह्म मय्यपि ॥२

अन्वयार्थ- [चतुर्मुखेंद्रदेवेषु मनुष्याश्वगवादिषु च-] ब्रह्मदेवादि देव व मनुष्य, घोडे, गायी इत्यादि इतर प्राणी यांच्या ठिकाणीं [यत् एकं चैतन्यं तत् ब्रह्म-] जें एक चैतन्य आहे तेंच ब्रह्म होय. [यत: प्रज्ञानं ब्रह्म-] आणि ज्याअर्थीं प्रज्ञान हें ब्रह्म आहे [अत: तत् मयि अपि अस्ति-] त्याअर्थीं तें माझ्या ठिकाणींहि आहे.

प्रकाश:- सर्व उत्तम, मध्यम व कनिष्ठ देहांमध्यें प्रत्ययाला येणारें हें प्रज्ञान (चैतन्य) एकरूपानें असतें. **शंका-**हें तुमचें म्हणणें आम्हांला मान्य नाहीं. कारण तें अनुभवविरुद्ध आहे. देवादिकांचें ज्ञानसामर्थ्य अधिक, मनुष्याचें त्यांहून कमी, पश्वादिकांचें त्यांच्याहूनहि कमी व कीड, मुंगी इत्यादिकांचें तर अगदींच संकुचित ज्ञानसामर्थ्य अनुभवाला येतें. शिवाय तुमच्या आचार्यांनीहि शारीरकांत 'वैषम्यनैर्घृण्याभाव' नांवाच्या अधिकरणांत ही गोष्ट स्वत: सांगितली आहे. **समाधान-** हें तुझें म्हणणें अक्षरश: खरें आहे. पण ज्ञान व प्रज्ञान यांचे अर्थ भिन्न भिन्न आहेत. ज्ञान म्हणजे वृत्तिज्ञान किंवा वैषयिक ज्ञान; व प्रज्ञान म्हणजे अंत:करणाचें साक्षि चैतन्य होय. त्यामुळें प्राण्याच्या योग्यतेप्रमाणें व पूर्वकर्माप्रमाणें ज्ञानामध्यें कमिअधिकपणा असणें साहजिकच आहे. पण प्रज्ञान हें सर्वांमध्यें साक्षिरूपानें सारखें भरून राहिलेलें असल्यामुळें व प्रत्येक प्राण्यांतील हें अनुभवरूप चैतन्य पृथक् आहे असें मानण्यास कांहींएक कारण नसल्यामुळें 'तें एक आहे' हा सिद्धान्त ठरला. तें सर्वांचेंहि कारण आहे; हें सर्व चराचर त्याचा एक अंश आहे; व तें स्वत: कारणशून्य आहे असें हजारों श्रुति व स्मृति प्रतिपादन करीत असल्यामुळें तेंच ब्रह्म (निरतिशय मोठें) होय. आतां गुरुकृपेनें ज्याला साक्षात्कार झाला आहे असा शिष्य म्हणतो कीं माझ्यामध्यें चैतन्य असल्यामुळें ह्या माझ्या देहामध्यें तें ब्रह्मच आहे. अन्य कांहीं नाहीं. 'द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि' म्ह० हे सर्व तूं आपल्या व माझ्या ठिकाणीं पहाशील;- असें श्रीकृष्णांचेंहि वाक्य याला प्रमाण आहे. ॥२॥

-ह्याप्रमाणें ऋग्वेदस्थमहावाक्याचें व्याख्यान करून आतां यजुर्वेदस्थ बृहदारण्यकांतील 'अहं ब्रह्मास्मि'-(बृ. १-४-१०) मी ब्रह्म आहें, या वाक्याचा अर्थ व्यक्त करण्याकरितां प्रथम 'अहं-' शब्दाचा अर्थ सांगतात-

परिपूर्ण: परात्मास्मिन्देहे विद्याधिकारिणि ।
बुद्धे: साक्षितया स्थित्वा स्फुरन्नहमितीर्यते ॥३

अन्वयार्थ- [परिपूर्ण: परात्मा-] सर्वत्र ओतप्रोत भरून राहणारा अखंड परात्मा [अस्मिन् विद्याधिकारिणि देहे-] ह्या मायिक जगांतील विद्येचा अधिकारी असलेल्या या देहांत [बुद्धे: साक्षितया स्थित्वा स्फुरन् सन् अहं इति ईर्यते-] बुद्धीचा साक्षि या नात्यानें राहून प्रकाशमान होऊं लागला असतां त्यालाच 'अहं' असें म्हणतात.

प्रकाश:- **परिपूर्ण**-देशत: कालत: व वस्तुत: मर्यादित न होणारा. अर्थात् सर्वव्यापी असा परमात्मा. नित्यानित्यवस्तुविवेक, इहामुत्रफलभोगविराग, शमादिषट्क व मुमुक्षुत्व या साधनचतुष्टयानें संपन्न असून ज्यानें गुरुशुश्रूषा करून त्यांच्यापासून श्रवण केलें आहे, व मननिदिध्यासाचा जो अभ्यास करीत आहे. अशा योग्य अधिकारी पुरुषाला स्वशरीरांत पूर्वोक्त परमात्मा सूक्ष्म शरीराला प्रकाशित करीत आहे, असा प्रत्यय येऊ लागतो. ह्याप्रमाणें बुद्धीचा साक्षि या रूपानें प्रत्ययाला येणारा जो आत्मा त्यालाच वेदान्तांत 'अहं' असें लक्षणेनें म्हणतात. प्राकृत पुरुष अहं शब्दाचा अर्थ आपलें शरीर असा समजतात. व दुसरे वादी इंद्रियांपासून आनंदमयापर्यंत

पर्यायानें आत्मा मानतात. पण वेदान्तशास्त्राला ही गोष्ट मान्य नसल्यामुळें त्यानें अहंशब्दानें येथें कोणाचा बोध होतो तें सुचविलें आहे. ॥२॥

-आतां पूर्वोक्त महावाक्यांतील 'ब्रह्म-' शब्दाचा अर्थ सांगतात-

स्वत: पूर्ण: परात्माऽत्र ब्रह्मशब्देन वर्णित: ।
अस्मीत्यैक्यपरामर्शस्तेन ब्रह्म भवाम्यहम् ॥४

अन्वयार्थ- [स्वत: पूर्ण: परात्मा अत्र ब्रह्मशब्देन वर्णित: अस्ति-] स्वत: परिपूर्ण असलेला जो परमात्मा त्याचेंच ह्या वाक्यांत 'ब्रह्म-' शब्दानें वर्णन केलें आहे. [अस्मि इति ऐक्यपरामर्श:-] 'अस्मि म्ह० आहें' असा त्यांच्या ऐक्याचा उल्लेख केला आहे. [तेन अहं ब्रह्म भवामि-] यास्तव मी ब्रह्म आहें.

प्रकाश:- पूर्वी अहंशब्दानें अधिकारी पुरुषाच्या देहांतील साक्षि चैतन्य लक्षित होतें, हें जसें सांगितलें; तसेंच स्वत: परिपूर्ण आत्मा ब्रह्मशब्दानें लक्षित होतो असें येथें सांगतात. लक्षण म्हणजे सूचक. प्रज्ञान (साक्षि चैतन्य ब्रह्म) वाणी व मन यांना विषय होणारें नसल्यामुळें त्याचा बोध करून देणारा प्रत्यक्ष शब्द नाहीं. म्हणून शिष्याला त्याच्याविषयीं कशीतरी भावना करितां यावी या हेतूनें अहं व ब्रह्म असे दोन शब्द श्रुतीनें योजिले आहेत. यांच्या योगानें निरुपाधिक अखंड चैतन्याचा लक्षणेनें बोध होतो. अस्मि (आहें) या पदानें अहंशब्दबोधित व ब्रह्मशब्दबोधित तत्त्व एकच आहे असा श्रुतीनें स्पष्ट उल्लेख केला असल्यामुळें शिष्य म्हणतो 'मी ब्रह्म होतों' 'मी तेंच आहें.' 'त्याच्या व माझ्यामध्यें यत्किंचित्‌हि भेद नाहीं.' ॥४॥

-आतां सामवेदीय छांदोग्योपनिषदांतील 'तत्त्वमसि' (६-७-८) तें तूं आहेस, या वाक्याचा अर्थ विशद करिण्याकरितां 'तें' या शब्दाचा लक्ष्यार्थ सांगतात-

एकमेवाद्वितीयं सन्नामरूपविवर्जितम् ।
सृष्टे: पुराऽधुनाप्यस्य तादृक्त्वं तदितीर्यते ॥५

अन्वयार्थ- [सृष्टे:पुरा-] सृष्टीच्या पूर्वीं [नामरूपविवर्जितम्] नामरूपरहित, [एकं एव अद्वितीयं सत् प्रतिपादितं अस्ति-] एकच व द्वितीयशून्य सत् असतें असें प्रतिपादन केलें आहे. [अस्य अधुना अपि तादृक्त्वं-] त्याचें स्वरूप ह्या काळीं सुद्धां तसेंच आहे असें [तत् इति पदेन ईर्यते-] 'तत्' या पदानें सांगितलें जातें.

प्रकाश:- ह्या श्लोकाचा भावार्थ असा आहे. -जें सृष्टिव्यक्तीच्या पूर्वीं सजातीय व स्वगतभेदशून्य एक व अद्वितीय ब्रह्म होतें तें आतां- (सृष्टीच्या व्यक्तावस्थेंत) हि तसेंच आहे. व पुन: सृष्टीलयानंतरहि तें तसेंच राहणार. आणि असें जें कालानेंहि मर्यादित न होणारें व तिन्ही अवस्थेंत एकरूपानें राहणारें ब्रह्म तें 'तत् (तें)' या पदाचा लक्ष्यार्थ आहे. पण हें ज्ञान पूर्ण विचारावांचून होत नाहीं. शब्दोच्चार होतांच लक्षांत येणारा अर्थ वाच्यार्थ; व शब्दोच्चार झाल्यावरहि वाक्यांत त्याच्या वाच्यार्थाची योजना न झाल्यामुळें त्याच्याशीं संबंद्ध असा विचारानें लक्षांत येणारा जो अन्य अर्थ तो लक्ष्यार्थ होय. ॥५॥

-आतां 'त्वं-' पदाचा लक्ष्यार्थ सांमतात-

श्रोतुर्देहेन्द्रियातीतं वस्त्वत्र त्वंपदेरितम् ।
एकता ग्राह्यतेऽसीति तदैक्यमनुभूयताम् ॥६

अन्वयार्थ- [श्रोतु: देहेंद्रियातीतं वस्तु अत्र त्वंपदेरितम्-] श्रवण करणाऱ्या जीवाच्या

देहेंद्रियांहून निराळी जी वस्तु तोच या ठिकाणीं 'त्वं-' पदाचा लक्ष्यार्थ आहे. [असि इति पदेन एकता ग्राह्यते-] 'आहेस' या पदानें श्रुती त्यांच्या ऐक्याचें ग्रहण करविते. [अत: तदैक्यं अनुभूयताम्-] यास्तव त्यांच्या ऐक्याचा अनुभव घ्यावा.

प्रकाश:- पूर्वोक्त वाक्यांत तूं या पदाचा लक्ष्यार्थ घ्यावा. कारण श्रवणमननादि व शमदमादि साधनांचें अनुष्ठान करणारा जो अधिकारी शिष्य त्याला स्थूलादि तिन्ही शरीरांहून पृथक् व त्यांचा साक्षी असा जो चैतन्यरूप आत्मा त्याचें ज्ञान होत असतें. अर्थात् तूं त्या शब्दाचा लोकप्रसिद्ध वाच्य अर्थ येथें न घेतां लक्ष्यार्थ घेतला पाहिजे. कारण त्याचा वाच्य अर्थ जो देह त्याचें तें या पदाच्या पूर्वोक्त शब्दार्थाशीं ऐक्य होणें संभवनीय नाहीं. या वाक्यांतील 'असि- आहेस' या पदानें 'तें व तूं यांचें ऐक्य आहे; तें तुझ्याहून पृथक् नाहीं;' असें सांगितलें आहे. यास्तव, हे प्रिय शिष्या, तें ब्रह्मच तूं आहेस, या उपदेशाचा एकांतांत बसून विचार करून तूं अनुभव घे. जगांत मनुष्यरूपानें उत्पन्न झाल्याचें जर कांहीं सार्थक होणें असेल तर तें या विचारानेंच होईल. सृष्टीविषयीं, संबंधी प्राण्यांविषयीं, किंवा द्रव्यादि धडधडीत जड पदार्थांविषयीं चिंतन केल्यानें शाश्वत सुख कधींहि मिळणार नाहीं. उलट त्याला मुकावें मात्र लागेल. केवळ दूरदर्शी विचारपटूंनाच हा उपदेश प्रिय वाटणार हें उघड आहे. कारण केवळ आयुष्यमर्यादेकडे पाहत राहणाऱ्या व बऱ्यावाईट रीतीनें मिळतील तसे भोग भोगणाऱ्या पामरांना 'आमची मृत झाल्यावर काय अवस्था होणार आहे' हा विचार कधीं चुकूनहि सुचत नाहीं. पण बाबानो, मी तुम्हांला नि:संशय सांगून ठेवितों कीं तुम्ही जितके जितके ऐहिक सुखांना भुलाल तितके तितके परमार्थाला अंतराल. ऐहिक सुखें क्षणभंगुर आहेत. आज जो देह, जी स्त्री, जीं मुलें, जे पशु व जें द्रव्य तुम्हांला आपलेंसें वाटत आहे तें सर्व तुम्हांला प्रसंगीं सोडील व राजाचा अपराध करणाराला जसे क्षुल्लक अधिकारीहि चाबुकाचा मार देत घरांतून बलात्कारानें नेतात त्याप्रमाणें आयुष्यक्षय झाल्यावर तुम्हांला (म्ह. तुमच्या सूक्ष्मशरीरयुक्त जीवाला) यमदूत खेंचून नेतील. त्यावेळीं ज्या देहाच्या पुष्टीकरितां तुम्ही इतके दिवस काळजी वाहिलीत तो देह, ज्या स्त्रीला प्रसन्न ठेवण्याकरितां तुम्ही परसेवादि करून आपलें प्रिय शरीर झिजविलेंत ती स्त्री, ज्या मुलांच्या संगोपनाकरितां तुम्हीं प्रसंगीं अयोग्य कृत्येंहि केलींत तीं मुलें किंवा एक कवडीहि इकडे तिकडे (धर्मादि कृत्यांत) जाऊं न देतां जें जीवासारखें बाळगून ठेविलेंत तें द्रव्य तुम्हांला सहाय्य करणार नाहीं. आजपर्यंत अनेक पुरुष असा उपदेश करीत आले. पण त्याच्याकडे लक्ष्य देतो कोण ? कारण त्यांच्या उपदेशाकडे लक्ष्य द्यावें तर तूर्त हातांतलें ग्राम्य सुख जातें. असो. तात्पर्य लोकांची प्रवृत्ति स्वभावत:च उन्मार्गाकडे असल्यामुळें सन्मार्गाकडे वळणारे लोक फारच थोडे आढळतात, व अशांकरितांच मोठ्या करुणापूर्ण वाणीनें श्रीस्वामी उपदेश करीत आहेत. ॥६॥

-आतां चवथ्या अथर्ववेदांतील 'अयं आत्मा ब्रह्म' हा आत्मा ब्रह्म आहे, या वाक्याचा अर्थ सांगण्याकरितां 'हा आत्मा' या दोन पदांचें व्याख्यान करितात-

स्वप्रकाशापरोक्षत्वमयमित्युक्तितो मतम् ।
अहंकारादिदेहान्तात्प्रत्यगात्मेति गीयते ॥७

अन्वयार्थ- [अयं इति उक्तित:-] हा या शब्दानें श्रुतीनें [स्वप्रकाशापरोक्षत्वं मतम्-] तो स्वप्रकाश असल्यामुळें त्याची प्रत्यक्षता मानिली आहे. [य: अहंकारादिदेहान्तात् प्रत्यक्-] जो अहंकारापासून देहापर्यंत पदार्थांच्या अधिष्ठानत्वानें व साक्षित्वानें आंतर-आंत असणारा [स: आत्मा इति गीयते-] तो

आत्मा असें म्हटला जातो.

प्रकाश:- 'हा' शब्द अगदीं जवळचा पदार्थ दाखवितो; असें आपण नेहमी व्यवहारांत पाहतों. तसेंच ही माण्डुक्य श्रुति 'हा' या शब्दानें आत्मा स्वयंप्रकाश असल्यामुळें अगदीं साक्षात् आहे असें सांगत आहे. पुष्कळ विद्वानांना सुद्धां मी (आत्मा) कोण ह्या प्रश्नाचा उलगडा होत नाहीं. कित्येक तर स्वत:विषयींच भ्रांत होऊन भलत्यालाच मी म्हणूं लागले आहेत. ही अडचण सर्वज्ञ श्रुतीनें प्रथमच जाणून आपला आश्रय करणाऱ्यांचीहि अशीच अवस्था होऊं नये म्हणून 'हा' (अगदीं जवळ असणारा) असा त्याचा निर्देश केला आहे. पण नुस्तें 'हा' म्हटल्यानें 'देह आत्मा' असेंहि होऊं लागेल. म्हणून पुढें लागलेंच आत्मा-म्हणजे अहंकार, बुद्धि, मन, इंद्रियें, प्राण, देह इत्यादि सर्वांचा आधार, साक्षी, प्रेरक-असें म्हटलें आहे. सारांश वेदानें 'हा आत्मा' असा निर्देश करून तो स्वर्गासारखा परोक्षहि नव्हे व घटासारखा इंद्रियप्रत्यक्षहि नव्हे असें मोठ्या कुशलतेनें सुचविलें आहे.

-ब्रह्म हा शब्द ब्राह्मण जाति या अर्थींहि रूढ आहे. यास्तव येथें त्याचा कोणता अर्थ विवक्षित आहे, तें सांगतात-

दृश्यमानस्य सर्वस्य जगतस्तत्त्वमीर्यते ।
ब्रह्मशब्देन तद्ब्रह्म स्वप्रकाशात्मरूपकम् ॥८

-इति पंचदश्यां महावाक्यविवेक: ॥५॥

अन्वयार्थ- [दृश्यमानस्य सर्वस्य जगत: तत्त्वं-] प्रतीत होणाऱ्या ह्या सर्व जगाचें तत्त्व [ब्रह्मशब्देन ईर्यते-] 'ब्रह्म-' शब्दानें सांगितलें जातें. [तत् च ब्रह्म स्वप्रकाशात्मरूपकं एव अस्ति-] तें ब्रह्म स्वप्रकाश जो आत्मा तद्रूपच आहे.

प्रकाश:- सृष्टीचा विचार करण्यांत गढून गेलेल्या तार्किकांनीं प्रत्यक्ष, अनुमान, उपमान व शाब्द अशीं चारच प्रमाणें मानिलीं आहेत. यास्तव या चार प्रमाणांना विषय होणारें जेवढें म्हणून जग आहे तें सर्वहि प्रमाणगम्य असल्यामुळें दृश्य; व दृश्य असल्यामुळें 'मिथ्या' आहे. मिथ्या भासणाऱ्या पदार्थांना तरी कांहीं आधार हा पाहिजेच. भासाचा जो आधार तेंच त्याचें तत्त्व असतें. भासलेल्या सर्पाचें तत्त्व रज्जु असतें असा सर्वत्र अनुभव आहे. अर्थात् या मिथ्या भासणाऱ्या जगाचें कांहीं तरी तत्त्व असलें पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे. त्या तत्त्वालाच वेदान्तांत 'ब्रह्म' असें म्हणतात. कारण तें आकाशादि यच्चयावत् सृष्टीचें कारण असल्यामुळं सर्वांपेक्षा महत् आहे. त्याचें सत्य, ज्ञान व अनन्त हें स्वरूप आहे असें पूर्वी सांगितलेंच आहे. तात्पर्य स्वप्रकाश हेंच स्वरूप ज्याचें आहे असें हें ब्रह्मच आत्मा आहे व हा आत्माच ब्रह्म आहे यास्तव हे मुमुक्षो, श्रवण, मनन, निदिध्यासन व शम, दम, तितिक्षा, उपरति, श्रद्धा, समाधान इत्यादि ज्ञानसाधनांचा निरंतर अभ्यास करून, त्या अगदीं निकट असतांनाहि अति दूर असल्याप्रमाणें भासणाऱ्या आत्म्याचा साक्षात्कार करून घे. आत्मसाक्षात्कारानें तूं कृतकृत्य होशील; व तुला पुन: या अति कष्टद जन्ममरणपरंपरेंत पडावें लागणार नाहीं. मनुष्यजन्माचें खरें खरें सार्थक या साक्षात्कारानेंच होणार आहे. आत्मज्ञानाकरितां दीर्घ प्रयत्न करणारे अनेक कुशाग्रबुद्धि पंडितहि भ्रमिष्ट होतात व त्यांना स्वत:च्या कुशलतेचा मोठा अभिमान वाटत असल्यामुळें त्यांचा ह्या श्रुतिप्रतिपादित तत्त्वावर विश्वास बसत नाहीं. त्यामुळें ते स्वत:च्या बुद्धिप्रतिभेप्रमाणें परस्पर विरुद्ध व श्रुतिविरुद्ध अशा अनेक कल्पना करीत सुटतात. त्यांचीं मतें स्वत:प्रमाण श्रुतिविरुद्ध असल्यामुळं आम्हांला तीं अति तुच्छ वाटतात खरीं; पण शिष्याच्या अंत:करणांत स्वसिद्धांत नि:संशयपणें आरूढ व्हावा म्हणून आम्ही त्यांच्या मतांचा उल्लेख करून तीं श्रुति व अनुभव यांच्या विरुद्ध कशीं आहेत हें दाखवितों. कारण मुमुक्षूंच्या अंत:करणांत संशय

राहणें हें अनर्थावह आहे. 'संशयात्मा विनश्यति' असें भगवद्वचनहि आहे. हें प्रकरण मुख्यत: ब्रह्मपर असल्यामुळें व ह्यांतील चारी वाक्यें श्रुतीचा एकदेश असल्यामुळें उपक्रमोपसंहारादि सहा तात्पर्यलिंगें येथें दाखविलीं नाहींत. ह्या महावाक्यावरून मुमुक्षूला आपला 'आत्माच ब्रह्म आहे' असें परोक्षज्ञान व या ज्ञानापासूनच पुढें अपरोक्षज्ञान होतें. तात्पर्य 'ह्याप्रमाणें विचार करून ईश्वरविषयक ज्ञानाचे प्रतिबंध नष्ट झाले असतां, स्वरूपप्राप्तिरूप मोक्ष प्राप्त होतो;' असें स्पष्ट प्रतिपादन करण्याकरितां श्रीमत् विद्यारण्यांनीं हें प्रथम पंचक केलें आहे. ॥८॥

६ चित्रदीप

-श्रीमद्विद्यारण्यमुनि पंचदशीचें 'चित्रदीप-' संज्ञक सहावें प्रकरण आरंभण्याच्या इच्छेनें प्रथमत: परमात्म्याचें स्मरण करून 'अध्यारोप व अपवाद यांच्या योगानें निष्प्रपंच वस्तूचें प्रतिपादन केलें जातें,' या न्यायास अनुसरून परमात्म्याचे ठिकाणीं आरोप केलेल्या स्थितीचा प्रकार दृष्टान्तपूर्वक वर्णन करण्याची प्रतिज्ञा करितात-

यथा चित्रपटे दृष्टमवस्थानां चतुष्टयम् ।
परमात्मनि विज्ञेयं तथाऽवस्थाचतुष्टयम् ॥१

अन्वयार्थ- [यथा चित्रपटे अवस्थानां चतुष्टयं दृष्टं-] ज्याप्रमाणें चित्राच्या पटामध्यें चार अवस्था दिसतात [तथा परमात्मनि अवस्थाचतुष्टयं विज्ञेयम्-] त्याचप्रमाणें परमात्म्याचे ठिकाणीं चार अवस्था आहेत; असें समजावें.

प्रकाश:- चित्र काढण्याकरितां चिताऱ्यानें एकादें वस्त्र घेतलें कीं त्याला चार अवस्था प्राप्त होतात; हें सर्व व्यवहारी लोकांना ठाऊक आहे. यास्तव या चित्रपटाचाच दृष्टान्त देऊन परमात्म्याच्या ठिकाणीं चार अवस्था कशा प्राप्त होतात हें सांगण्याकरितां ह्या प्रकरणाचा आरंभ केला आहे. ब्रह्म ही वस्तु निष्प्रपंच म्ह० प्रपंचशून्य असल्यामुळें जरी त्याविषयीं कांहींएक बोलतां येत नसलें तरी अध्यारोप व अपवाद यांच्या योगानें त्याचा प्रपंच करितां येतो. 'अध्यारोप' म्हणजे वस्तूच्या ठिकाणीं तद्भिन्न अशा इतर पदार्थांची कल्पना व 'अपवाद' म्हणजे त्या कल्पनेचा युक्ति व अनुभव यांच्या द्वारा निषेध. यास्तव या अध्यारोपादिकांच्या द्वारा ब्रह्माचें प्रतिपादन करण्याकरितां श्रीस्वामी या प्रकरणाचा आरंभ करीत आहेत. ॥१॥

-दृष्टान्त पट व दार्ष्टान्तिक परमात्मा यांच्या ठिकाणच्या चार अवस्था कोणत्या तें आतां सांगतात-

यथा धौतो घट्टितश्च लाञ्छितो रञ्जित: पट: ।
चिदन्तर्यामी सूत्रात्मा विराट् चात्मा तथेर्यते ॥२

अन्वयार्थ- [यथा पट: धौत: घट्टित: लाञ्छित: रञ्जित: च भवति-] ज्याप्रमाणें चित्राचा पट-वस्त्र धुतलेला, खळ सारवलेला, आंखलेला व रंग भरलेला अशा चार अवस्थांनीं युक्त असतो [तथा आत्मा चित् अंतर्यामी सूत्रात्मा विराट् च इति ईर्यते-] त्याप्रमाणें परमात्मा चित्, अंतर्यामी, सूत्रात्मा व विराट् अशा चार अवस्थांनीं युक्त होतो.

-दृष्टान्तरूप पटाच्या चारी अवस्थांचें स्वरूप क्रमानें सांगतात-

स्वत: शुभ्रोऽत्र धौत: स्याद्घट्टितोऽन्नविलेपनात् ।
मष्याकारैर्लांछित: स्याद्रंजितो वर्णपूरणात् ॥३